# वसई विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## ता.वसई जि. पालघर

जा.क्र.वविशम/प्रसए/विवि/१२६/२०२१
दि.२० /०९/२०२१

**जाहिर दरपत्रक क्र.७ (२०२१-२२)**

याद्वारे सर्व साहित्य पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (ए) विरार (प), बोंळीज विभागीय कार्यालयातील दुसरा मजल्यावर विद्युतीकरण करणे कामी इच्छुक व्यक्ती, पुरवठा व संस्था यांचेकडून दि.२१ /०९/२०२१ ते दि. ३० /०९/२०२१ पर्यंत बंद पाकीटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके प्रभाग समिती (ए) बोंळीज आवक-जावक विभागात सादर करण्यात यावी. साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर (प्रति नग) सर्व करांसहित | रक्कम सर्व करांसहित |
|---|---|---|---|---|
| १. | कॅसिंग-कॅपिंग पॉईट | ४२ | | |
| २. | सॉकेट-स्विच पॉईट | ३० | | |
| ३. | ६ A स्विच | १८ | | |
| ४. | १६ A स्विच | १२ | | |
| ५. | ६ A सॉकेट सेफ्टी शेटरसहित | १८ | | |
| ६. | १६ A सॉकेट सेफ्टी शेटरसहित | १२ | | |
| ७. | FPMCB ६३ A | १ | | |
| ८. | SPMCB ६ A ते ३२ A | ४ | | |
| ९. | डिस्ट्रीबुशन बोर्ड | १ | | |
| १०. | PVC मोड्युलर स्विच बॉक्स,१८ वे | ३ | | |
| ११. | PVC मोड्युलर स्विच बॉक्स,१२ वे | ४ | | |
| १२. | २ x १.५ स्के.एम.एम.कॉपर वायर | ७० | | |
| १३. | २ x ४ स्के.एम.एम.कॉपर वायर | ८० | | |
| | | | एकुण | |

**अटी - शर्ती**

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे दरपत्रकावर वस्तु व सेवाकर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) ठेकेदारांनी दरपत्रक भरताना लिफाफ्यात खालील नमुद केलेली तांत्रिक बाबींचा कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

**१) गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) नोंदणी झेरॉक्स प्रत,२) १०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र**

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे शासन निर्णय क्र. सीएसटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दि.२८ नोव्हेंबर २०१८ अन्वयेच्या विहीत नमुन्यातील परिशिष्ट-१ नुसार यापुढे ३.०० लक्ष आतील स्थानिक व ३.०० वरील किंमतीच्या ई-निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.०१ मध्ये कंत्राटदारास **अपलोड करुन सर्व कागदपत्रे मनपा कार्यालयामध्ये देणे** बंधनकारक करण्यात येत आहे. व दरपत्रकात तसेच निविदा मंजूरी व नंतर देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील.सार्वजनिक बांधकामाचे अधिकारी त्यास जबाबदार असणार नाही.सदरची कागदपत्रे दरपत्रकात नसल्यास संबंधित दरपत्रकधारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र दरपत्रकधारकाच्या स्पर्धात्मक दरपत्रकधारकाचा लिफाफा उघडण्यात येईल.

Scanned with CamScanner

४) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ए) कार्यालयातील आवक - जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

५) दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करणे बंधनकारक राहील.

६) मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

७) दरपत्रक मंजूरी झालेनंतर कार्यादेश दिल्यापासून साहित्य पुरवठा करणेची मुदत १५ दिवसांची राहील.

८) कार्यादेश दिल्यापासून दिलेल्या मुदतीत विद्युतीय काम न केल्यास प्रतिदिन रु. ५००/- होणाऱ्या देयकातुन परस्पर कपात केली जाईल.

९) दरपत्रकात दर सादर करताना मुळ किंमत, वस्तु व सेवाकर (GST) व इतर सर्व करासहित भरावयाचे आहेत. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. सहा.आयुक्त,प्रभाग समिती (ए) यांना राहील.

१०) वरील अटीचे पालन जे, पुरवठादार व संस्था करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.

११) यासंबंधीची दरपत्रके स्वत:चे लेटर पॅडवर बंद पाकीटातून दि३०/०९/२०२१ रोजी दुपारी ३:०० वाजता प्रभाग समिती (ए) कार्यालयात सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ३० /०९/२०२१ रोजी सायं ४:०० वाजता मा. सहा.आयुक्त,प्रभाग समिती (ए) यांच्या दालनात उपस्थित दरपत्रकावर अथवा त्यांचे प्रतिनिधी त्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ- प्रभाग समिती ए, बोळींज**

**दिनांक : २० /०९/२०२१**

उप-आयुक्त

परिमंडळ क्र.१

वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner